International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 | Impact Factor – 8.141
Peer Reviewed | Bi-Monthly
Vol. 7 No. 2 | January – February - 2026

# ‘लॉकडाऊन’कादंबरीतील वैश्विक मानवतेचे दर्शन

**डॉ. नंदकुमार शंकरराव इंगळे**

*प्र-प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख,*

*विद्या मंदिर मंडळ संचालित,*

*मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस कला व वाणिज्य महाविद्यालय,*

*ममदापूर-नेरळ , ता. कर्जत, जि.रायगड ४१०१०१*

***Corresponding Author –* डॉ. नंदकुमार शंकरराव इंगळे**

**DOI - 10.5281/zenodo.18654234**

**प्रस्तावना:**

जगाचा इतिहास लिहिताना जागतिक ठळक घाडामोडीं, घटना, प्रसंग, युद्ध, करार, ज्याचा दूरगामी परिणाम अखंड मानव जातीवरच नव्हे तर अखील जीवसृष्टीवर होतो, अशा प्रत्येक बाबींची नोंद घेतली जाते त्या मध्ये कोविड-19’ यांस दूरलक्षून चालणार नाही. कोविड काळात कधी नव्हे ते अवघे जग थांबले गेले. जगाचा सारा व्यवहार ठप्प झाला. या महामारीचा परिणाम केवळ मानवावरच नव्हे तर प्राणीमात्रांवर देखील झाला. जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात याचा घातक परिणाम जाणवला. याची झळ शेवटच्या घटकांपर्यन्त पोहचली. कोविडचा परिणाम भारतातील प्रत्येक शहरातच नाही तर खेड्यापाड्यावर झाला, यावेळी खेड्यातील माणसांनी या संकटाचा सामना कसा केला, याचे जिवंत चित्रण डॉ.श्रीकांत पाटील यांची ‘लॉकडाऊन’ ही कादंबरी करते. ही कादंबरी आधुनिक मराठी साहित्यातील एक वास्तव्य दर्शवणारी कादंबरी ठरते. कोविड -19 या जागतिक महामारीने जगभरात माणसांच्या जीवन जगण्याची पद्धत बदलून टाकली. कोरोना कालावधीतील सामाजिक, आर्थिक आणि मानसिक वास्तवाचे प्रभावी आणि परिणामकारक चित्रण करणारी जागतिक दर्जाची, वैश्विक मानवतेचे दर्शन घडविणारी कादंबरी म्हणून डॉ.श्रीकांत पाटील यांच्या ‘लॉकडाऊन’ या कादंबरीकडे पाहता येईल.

**कथानक:**

‘लॉकडाऊन’ ही कादंबरी 2020 सालच्या कोरोना काळात आलेल्या महामारीचा जगावर झालेला परिणाम हा जागतिकतेतून महाराष्ट्रातल्या अगदी शेवटच्या घटकांपर्यंत म्हणजे खेड्यापाडात त्याचा काय परिणाम झाला, याची माहिती आपल्याला ही कादंबरी देते. कादंबरीत तृतीय पुरुषी निवेदन वापरले गेले असून कादंबरीचा नायक परसू हा सधन शेतकरी आहे. तो त्याची पत्नी रखमा आणि आई वडील असा त्यांचा छोटासा संसार आहे. लॉकडाऊन लागण्याच्या आधी त्याचे आई-वडील पुण्याला आपल्या मुलीकडे काही दिवस राहायला गेले आहेत परंतु ते पुण्यामध्येच अडकलेले आहे. परशुराम त्याची बायको रखमा हे दांपत्य छोटासा संसार सांभाळत शेती, जनावरे, मळा आणि दूध संकलन केंद्र एवढे त्यांचे विश्व आहे. यामध्ये त्याचे जिवलग मित्र देखील आहेत, शिवा गुरुजी व मनोज हे शिक्षकपेक्षात आहेत तर, अशोक व विश्वनाथ कारखान्यात व एमआयडीसीत कामगार म्हणून आहेत. 22 मार्च 2020 पासून म्हणजेच लॉकडाऊन लागल्यापासून या कादंबरीची

सुरुवात होते. सर्वांचेच काम थांबलेले आहेत, त्यामुळे हे सर्व मित्र लॉकडाऊन काळातही दररोज परसूच्या मळ्यात एकत्र जमतात. परशुराम हा जात्याचा शेतकरी सुशिक्षित असून सकाळी उजाडल्यापासून तो मळ्याकडे जावून शेतातली कामे करायचा आणि दुधाच्या किटल्या घेऊन डेअरीत जायचा असा त्याचा दिनक्रम परंतु कोरोनाचा रुग्ण जेव्हा पहिल्यांदा पुण्यात सापडला तेथून त्याच्या आयुष्यात कोरोनाचा विचार डोक्यात सारखा घोंगावू लागला. त्या कोरोनाची धास्ती घेऊन त्यापासून स्वतःचा, आपल्या कुटुंबाचा तसेच संपूर्ण गावाचा बचाव कसा करता येईल याच्या विवंचनेत तो व त्याचे मित्रवर्य असायचे. संपूर्ण देशात जेव्हा अचानक लॉकडाऊन लावला गेला. संपूर्ण जग थांबले बाजारपेठ ओस पडल्या, वाहतूक, शाळा, कॉलेजेस, कारखाने, कार्यालय हे सर्व काही बंद होतं. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला भाजीपाला, पिकांची विक्री करता येत नव्हती. सण, समारंभ, उत्सव यावर शासनाने बंदी घातली होती. परप्रांतीय मजूर बेकार आणि बेघर झाले होते. मजुरांचे लोंढेच्या लोंढे आपल्या गावी जाण्यासाठी अनवाणी प्रवास करतानाचे वर्णन या कादंबरीत आलेले आहे. गावात अडकलेली नंदिवाले, लमाण कुटुंबीय यांचेही चित्रण या कादंबरीत आलेले आहे. शेतकरी हवालदील झालेला आहे. अशा अवस्थेत परशुराम हाडाचा शेतकरी हार मानत नाही आणि कोरोना काळातही तो अद्यावत राहतोय. वर्तमानपत्र, टीव्ही, रेडिओच्या बातम्या बघून-ऐकून, तो सारा देश कोरोना विरुद्ध कसा लढतो आहे व आपण यात हातभार लावायला हवा असा विचार तो आपल्या मित्रांना सांगतो, आपल्या गावाला या कोरोना पासून वाचवायला हवं स्वतः सुरक्षित राहून गावालाही सुरक्षित ठेवायचं असा तो चंग बांधतो. या कामात त्याला त्याची पत्नी रखमा त्याचे मित्र तसेच गावातील सरपंच तात्या, पोलीस पाटील, ग्रामसेवक व स्वयंसेवक या सर्वांची साथ कशी मिळते याचं वर्णन यात आलेले आहे. या सर्वांच्या सोबत तो गावावर नियंत्रण ठेवतो कोरोना पासून गावाला वाचवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करतो. कोरोनाबाबत गावकऱ्यांनी सजग राहावे म्हणून तो स्वतः कपडा आणून त्याचे मास्क आपली पत्नी रखमा हिच्याकडून शिवून घेतो. याकामी त्याचे मित्र देखील त्याला मदत करतात आणि गावातल्या बायांना देखील त्यामुळे रोजगार निर्माण होतो. सर्व गावाला ते मास्क वाटप करतात. गावातल्या लोकांचे हाल होत होते, शेतकऱ्याच्या मालाला जिल्हाबंदी असल्या कारणामुळे माल हातात आणून देखील त्याला विकता येत नव्हतं, शेतकरी संकटात होता शेतमजूरी करणारे, ऊसतोड कामगार, त्यांच्या रोजी रोटी वर कुऱ्हाड कोसळली होती, गावात इतर लोकांना यायला व बाहेर जायला मनाई असल्याने काही लमान कुटुंबीय, नंदीवाले, वडार गावातच अडकले गेले होते. त्यांच्याही दोन वेळच्या खायचे चिंता होती अशावेळी परशुराम व त्याच्या मित्रांनी दोन महिने पुरेल इतका किराणा धान्य आणून त्यांना मदत केली होती. गावात फवारणी करणेकामी स्वतःहून पुढाकार घेऊन परशुराम आपल्या सहकाऱ्यांसोबत फवारणी करत होता. या कादंबरीतून आपणास दिसते की कोरोना काळामध्ये शासनाने जे काही नियमावली दिली गेली होती त्या नियमावलीचा काटेकोर पालन आपल्या गावांमध्ये होतं की नाही याची जातीने काळजी परसू व त्याचे सहकारी व गावातील पंचमंडळी घेत होते. या कादंबरीतून आपणाला कळतं की सण, समारंभ, उत्सव, यात्रा, जत्रा यावर बंदी जरी असली तर ‘घरातूनच या देवांची पूजा करून सण उत्सव साजरे करता येतात’ असा संदेश देखील या कादंबरीच्या पात्रातून व्यक्त होताना दिसतो. याच दरम्यान मुंबई सारख्या शहरातील परिस्थितीची जाणीव व तेथील घडामोडी गावातील संभाजी नावाचा पोलीस जो मुंबईला कामावर होता, त्यामार्फत गावकऱ्यांना कळत होत्या. शासनाच्या

नियमांचा पालन न करणारे, उडानटप्पू लोकं, कोरोंनात मृत्यू पावलेली लोकं, त्यांच्या मृत्यूला जबाबदार धरून डॉक्टर व नर्सवर देखील हल्ला करणारे, अशी असामाजिक उदाहरणे दाखवली गेली आहेत. यामध्ये शहरातील लोक जे लोकडाऊनला कंटाळलेले आहेत ते खुलेआम पणे बाहेर फिरताना दिसत होते. कोणत्याही प्रकारचा सामाजिक अंतर ते राखत नाहीत. अगदी बिनधास्तपणे वावरताना दिसतात. तसेच याशिवाय काही सुखकारक बातम्याही येत होत्या, त्यामध्ये कोरोनातून बरे झालेल्या व्यक्तींवर लोक फुल उधळत होती तसेच पोलीस, नर्स, आशा,अंगणवाडी सेविका यांचा देखील जागोजागी सन्मान केला जात होता या बातम्या संभाजी कडून परसू व त्याच्या सहकाऱ्यांना कळत होत्या. त्यामुळे आपणही कोरोना योद्धांचा यांचा सत्कार करावा असं ठरवून ते ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आशा, अंगणवाडी सेविका, यांचा ते सन्मान करतात या कादंबरीतून अस्मानी संकटालाही शेतकऱ्याला कसे तोंड द्यावं लागत होते याचं उदाहरण आलेलं दिसतं. वळीवाच्या जोरदार पावसामुळे पिकांची झालेली नासाडी काढणीला आलेले कलिंगड जेव्हा गारपिटाने फुटून गेली, त्यावेळी लहान मुलासारखा रडणारा तात्या व त्याला धीर देणारा परसू आपल्याला दिसून येतात. गावाच्या बाहेर ऊसतोड मजुरांच्या व गबाळयांचा विस्कटलेला झोपड्या त्यांचे भिजलेला संसार त्यांना देखील गाव कसं सहकार्य करतं त्यांची राहण्याची व्यवस्था शाळेच्या इमारतीमध्ये केली जाते, त्यांना अन्नधान्याचा पुरवठा केला जातो. व इथे आपल्याला संपूर्ण गाव माणुसकी जपताना दिसतो या कादंबरीतूनच आपल्याला निसर्गाचा संतुलन कायम ठेवण्यासाठी निसर्ग स्वतः प्रयत्न करताना दिसतो. लेखक म्हणतो की, ‘माणसाने काहीच न करता जरी तो राहिला तरी निसर्ग आपला काम चोखपणे बजावतो. लॉकडाऊनच्या काळामध्ये नदी, ओढे, नाले, अफसुकच स्वच्छ झाले होते. नदीच्या पात्रातून मगरींचा वावर दिसत होता. वेग वेगळया पक्षांचे थवे गाव शिवारातून रानावरात फिरताना दिसत होते. हे सगळं निसर्गाने स्वतःहून केलं होतं. लेखक म्हणतात की निसर्गाला कर्मकांडाची आवश्यकता नाही; उलट माणसांच्या लालचीपणाचा, भोगवलासाचा आणि अतिरेकाचा त्याला उबग आला असावा, म्हणूनच हा कोरोना नावाचा संकट या मानव जातीवर आलं की काय असा प्रश्न कादंबरीतून आपल्याला पडताना दिसतो. मोठ्या थाटामाटात, गाजावाजा करून, अमाप पैसा खर्च करून होणारी लग्न देखील थोडक्यात आटपता येतात, हे आप्पा बडे यांच्या उदाहरणातून आपल्याला या कादंबरीतून जाणवते. कलाकार मंडळी देखील या काळामध्ये माणुसकी जपताना दिसतात. स्वतःच्या हाताला काम नसताना देखील ते कोरोनाकाळामध्ये पोलिसांना मदत करताना आढळतात. लॉकडाऊन चा पहिला, दुसरा, व तिसरा कालावधी यामध्ये बदलत जाणारी परिस्थिती, सरकारने केलेल्या उपाययोजना, टप्प्याटप्प्याने शिथिल केलेले नियम, लवकर शोधली जाणारी लस यामध्ये काही प्रश्न निरुत्तरित ठेवून कादंबरी संपवली आहे.

**लेखनशैलीचे वैशिष्ट्ये:**

डॉक्टर श्रीकांत पाटील यांची ‘लॉकडाऊन’ ही कादंबरी कोल्हापूरच्या अस्सल तांबड्या मातीतील एका खेड्या गावात घडलेली आहे. त्यामुळे पात्रांच्या संवादातून अस्सल गावरान बोली ऐकायला मिळते. याचे कथानक वारणा नदीच्या काठी असलेल्या एका गावातील आहे. तृतीय पुरुषी निवेदनाची जरी ही कादंबरी असली तरी यातील हे संवाद जिवंत आहे. आपण चित्रपट पाहिल्याचा भास होतोच परंतु; ते लॉकडाऊन काळातील सर्वांचाच अनुभव आहे आणि तो आपण स्वतः पाहून अनुभूती घेतोय, मागचा पट उघडतो की काय याचा पदोपदी भास होतो.

**भाषाशैली:**

कादंबरीची भाषा शैली साधी आणि वास्तववादी आहे. यात कुठेही कृत्रिमतेचा स्पर्श आढळत नाही. जे जे घडले ते सरसकट अगदी बारीक बारीक तपशीलवार वर्णन या कादंबरीमध्ये मांडले गेले आहे. लेखकाने ग्रामीण जीवनाचे समाजाचे जिवंत चित्रण आपल्या सरळ भाषेतून केलेले आहे.

**प्रतिकांचा वापर:**

डॉ. श्रीकांत पाटील यांची ही वास्तवदर्शी कादंबरी आहे. यात वास्तववादाचे आणि प्रतीकात्मतेचे सुंदर चित्रण आढळते. कादंबरी मधील एकेक पान उलघडताना लॉकडाऊन च्या काळातील परिस्थितीचे भयानक अनुभव आणि चित्रण यात आलेले आहे. या कादंबरीत **'लॉकडाऊन'** हे केवळ रोगप्रतिबंधात्मक बंद नाही तर ते मानवी जीवनाच्या एक भयाण अंध:कारमय भाग आहे. भीती, एकाकीपणा आणि अंधाराचे प्रतीक आहे.

**परसू** - कादंबरी मधला नायक **परसू** ही व्यक्तिरेखा सामान्य माणसाचं लॉकडाऊन मधील संघर्ष चित्रीत करतो. हा संघर्ष प्रत्येक माणसाने लॉकडाऊन मध्ये अनुभवलेला आहे. परंतु **परसू** केवळ घरात न थांबता इतरांना धीर देण्याचे काम करतो. प्रत्येकाला मदत करतो हे मानवतेचे एक प्रतिनिधीक स्वरूप आहे. परसूच्या प्रतिकातून हे दिसून येते. त्याच्या प्रत्येक कृतीतून मानवतावाद दिसतो. वैश्विक मानवतेचे प्रतिक दिसते.

**गाव -** या कादंबरीच्या मधील दर्शवलेला गाव हा वारणा काठी कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा नदीच्या काठावरील एक खेडेगाव असो संपूर्ण भारतातील गाव व्यवस्थेवरील भाष्य या प्रतीकातून येते लॉकडाऊन काळात शहरातील माणसे चार भिंतीच्या आड होती परंतु; गावातील माणसांचे जीवनक्रम हा शेतीवरच पूर्णता अवलंबून असते. माणसांना प्रत्यक्ष संवाद आणि सहचार्य यात ही गावाकडची मंडळी एकमेकांत विणलेली असतात परंतु कोरोना कालावधीतील त्यांची रोजची सवय मोडली गेली होती. गावबंदी केली होती. रात्रीचा पहारा, गस्त चालू होती. गावाचे संरक्षण व्हावे या हेतूने चालले होते. यामध्ये कोणती शासकीय यंत्रणा काम करत नव्हती, तर स्वयंस्फूर्तीने चाललं होतं हे अवघ्या भारतातभर घडत होते. येथे वर्णन केलेले गाव हे भारतातील खेडेगावाचे प्रतिक म्हणून येथे मांडले गेले.

**गावरान बोली -** कादंबरीमध्ये गावातील कथानक असल्याने साहजिकच गावातील बोलीभाषांचा वापर यामध्ये आलेला आहे. यामध्ये व्यक्तिरेखांच्या तोंडी गावातील अस्सल गावरान म्हणी आलेले आहेत. यामध्ये पान क्रमांक ८३ वरील 'बाच्या बा मेला आणि बोंबलताना हात भी गेला अशीच त्यांच्यावर वेळ आली असेल' ' आई जेऊ घालिना आणि बाप भीक मागू देईना' यां सारखी उदाहरणे आलेली आहेत. ओघवत्या भाषाशैलीचा वापर केला आहे. यात कुठेही भंपकपणा अथवा अतिरंजीतपणा आढळत नाही. भाषा सरळ साधी व समजण्यास अत्यंत सोपी वापरली आहे.

**समारोप:**

डॉ. श्रीकांत पाटील हे उच्च दर्जाचे श्रेष्ठ कादंबरीकार आहेत. कथा, कविता,कादंबरी नाटक, नाट्यछटा, बालगीते अशा विविध साहित्य प्रकरातून ते उच्च दर्जाचे लेखन करतात. अनेक मोठमोठे राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कार त्यांच्या साहित्याला मिळालेले आहेत. अशा जागतिक दर्जाच्या लेखकाची 'लॉकडाऊन' ही कादंबरीही जागतिक दर्जाचीच आहे. या कादंबरीचे इंग्रजीमध्ये भाषांतर झाल्याने जगालाही या कादंबरीतील वैश्विक मानवतेचे दर्शन झाले आहे. जगानेही

त्याची दखल घेतली आहे. या कादंबरीलाही अनेक मानाचे पुरस्कार मिळालेले आहेत.

**निष्कर्ष:**

- कोरोना काळात आलेल्या महामारीचा जगावर झालेला परिणाम या कादंबरीतून प्रभावीपणे दिसून येतो.
- जगावर आलेल्या कोविडच्या संकटांचा सामना खेड्यातील माणसांनी कसा केला याचे प्रभावी चित्रण ही कादंबरी करते.
- परसू हा या कादंबरीचा मेहनती,आशावादी,मानवतावादी सुशिक्षित नायक आहे.
- लॉकडाऊन पडल्यानंतर माणसांची झालेली दयनीय अवस्थेच विदारक विदारक वर्णन ही कादंबरी करते.
- कोरोना काळात परसू आणि त्याची बायको रखमा यांनी मानवतावादी दृष्टीकोनातून केलेले कार्य ही कादंबरी रेखाटते.
- घरातूनच देवाची पूजा करून सन-उत्सव साजरे करता येतात, हा संदेश ही कादंबरी देते.
- अस्मानी संकटांनाही शेतकरी कसे तोंड देतो याचे वर्णन ही कादंबरी करते.
- या कादंबरीतील कलाकारांचाही मानवतावादी दृष्टीकोन दिसतो.
- 'लॉकडाऊन' ही कादंबरी कोल्हापूरच्या अस्सल तांबड्या मातीतील एका खेड्या गावात घडलेली आहे.
- वारणा नदीच्या काठच्या असलेल्या अस्सल गावरान बोली ऐकायला मिळतात.
- परसूच्या प्रत्येक कृतीतून मानवतावाद दिसतो. वैश्विक मानवतेचे प्रतिक दिसते.
- इंग्रजीमध्ये ही कादंबरी प्रकाशित झाल्याने जगालाही या कादंबरीतील मानवतावाद दिसेल.

**संदर्भ:**


1. लॉकडाऊन – डॉ. श्रीकांत पाटील , सप्तर्षी प्रकाशन, पनवेल.
2. जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कादंबरी – डॉ.संभाजी पाटील /प्रा. बापूसाहेब जवळेकर
3. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य – संपादक : डॉ. सुरेश शिंदे
4. ग्रामीण साहित्य आणि संस्कृती – मोहन पाटील
5. मराठी ग्रामीण कादंबरी – रवीद्र ठाकूर